# एनईपी, च्या प्रचारासाठी विद्यार्थी मैदानात

## यूजीसीकडून 'एनईपी सारथी' योजना जाहीर

पुणे ः राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला असून त्यामध्ये विद्यार्थ्यांचा  सहभाग वाढवणे आणि त्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एनईपी सारथी ही योजना जाहीर केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यात एनईपीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी राज्यातील सतरा उच्च शिक्षणसंस्थांतील 84 विद्यार्थ्यांची निवड करण्यात असून यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा देखील समावेश आहे.

विद्यापीठअनदान आयोगाने नुकतीच एनईपी सारथी योजनेतील निवड झालेल्या विद्यार्थांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार देशातील शंभर पेक्षा अधिक उच्च शिक्षण संस्थातील 700 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.  अशी माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाचे  सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे दिली.

एनईपी सारथी योजनेच्या माध्यमातून देशभरातील विविध उच्च शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवणे, शैक्षणिक धेरणाच्या अंमलबजावणीत मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानुसार देशभारतील विद्यापीठे, महाविद्यालय,, उच्च शिक्षण संस्थांकडून नेतृत्व क्षमता,   चांगले  संवादकौशल्य, व जबाबदारीचे भान असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिफारशीचे प्रस्ताव मागवण्यात आले होते. .त्यानुसार युजीसीने देशभरातील शंभरहून अधिक उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांची निवड केली. यामध्ये केंद्रीय विद्यापीठ, राज्य विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालय व खासगी विद्यापीठांचा समावेश आहे. या सर्व संस्थांमधील पदवीपूर्व ते पीएचडी अभ्यासक्रमाच्या 84 विद्यार्थ्यांना एनईपी सारथी म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी प्रत्येक संस्थेून दोन ते चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

### चौकट ः पुण्यातील या संस्थांची  निवड ः

***एनईपी सारथी योजनेसाठी पुण्यातील टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ, एमआयटी एडीटी विद्यापीठ, डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, इंडिया श्री शिवाजी मेमोरियल  सोसायटीचे इन्स्टिट्यूट  ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, जी. एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲंड मॅनेजमेंट या उच्चशिक्षण संस्थांचा समावेश आहे***